महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2620238, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

परिपत्रक

क्रमांक : एफएलआर ११०६/४१६६१/५-ब मुंबई, दि. ७ जुलै, २००६

भारतीय बनावटीचे विदेशी मद्य महाराष्ट्र विदेशी मद्य (Transport & Export Underbond) नियम १९६८ चे नियम ३,४,५ व ६ च्या तरतुदीनुसार परदेशात निर्यात करण्याकरीता निर्यात पास मंजूर करण्यात येतात. परंतु असे परवाने मंजूर करताना निर्यातदार घटकाडून आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्राची पुर्तता करण्यात येत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे निर्यातदार घटकाकडून परदेशात मद्य निर्यातीच्या नावाखाली इतर ठीकाणी मद्य पुरविण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा भारतीय बनावटीचे विदेशी मद्य/ बियर इत्यादी निर्यात करण्याकरीता उपरोक्त नियमान्वये निर्यात पास मंजूर करण्या अगोदर जिल्हाधिकारी तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी खालील कागदपत्रे प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

अ) परदेशात मद्य निर्यातीचा पास मंजूर करण्यापुर्वी आवश्यक कागदपत्रे

१. परदेशातील आयातदार घटकाचे त्याचे लेटर हेडवर निर्यातदार कडून मद्य खरेदीबाबतचे पत्र

२. भारतीय बनावटीचे विदेशी मद्य विक्री बाबत आयातदार घटकाकडून घेण्यात आलेली आगाऊ रक्कमेचा पुरावा किंवा उधारीत मद्यसाठा घेत असल्याचा पुरावा. (Receipt of L/C OR Advance Amount )

३. विदेशी मद्य परदेशात मुंबई बंदरामार्फत निर्यात करताना मुंबई येथील कस्टम विभागाचे विदेशी मद्य परदेशात निर्यात करण्याबाबतची परवानगीचे किंवा ना-हरकत पत्र

४. कस्टम विभागाचे अ.क्र.३ मधील परवानगी पत्र / ना-हरकत पत्र प्राप्त झाल्यानंतर विदेशी मद्य Container मध्ये भरण्याबाबत केंद्रीय उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांचे परवानगी पत्र

ब) <u>वरील अ.क्र. १ ते ४ मधील कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर</u>

५. उपरोक्त सर्व कागदपत्रे तपासणी करुन अधीक्षक / जिल्हाधिकारी यांनी आवश्यक असलेले निर्यात पास मंजूर करावेत.

क) <u>निर्माणीतून मद्य निर्गमित झाल्यानंतर करावयाच्या कागदपत्राची पूर्तता</u>

६. मद्यसाठा परदेशी पाठविण्याकरीता जहाजाचे सुपूर्द केल्याबाबत संबंधित शिपींग कंपनीकडून त्यासंदर्भातील प्रमाणपत्र (Bill Of Lading)

७. Export Promotion शिपींग बीलाची प्रत बिल ऑफ लॅडींग च्या तारखेपासून ९० दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

८. मद्य जहाजावर चढविल्याबाबत जहाजाचे कॅप्टनचे प्रमाणपत्र (Mate Receipt)

ड) <u>निर्माणीचे विदेशी मद्य निर्यातीचे व्यवहार संशयास्पद वाटल्यास वरील १ ते ८ व्यतिरिक्त खालील कागदपत्रे प्राप्त करुन व्यवहार योग्य व खात्रीशीर असल्याचे खातरजमा करुन घ्यावी.</u>

९. आयातदार देशाकडील विदेशी मद्य प्राप्त झाल्याबाबतची कस्टमची पोच पावती.

१०. आयातदाने खरेदी केलेल्या विदेशी मद्याची किंमत अदा केल्याचा पुरावा (Receipt of L/C <u>OR</u> Advance Amount )

या परिपत्रकाची सर्व अधीक्षकांनी पोच पावती उलट टपाली सादर करावी.

(सी.एस.संगीतराव)
आयुक्त
राज्य उत्पादन शुल्क, महराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
५. या कार्यालयातील कार्यासन क्रमांक १२ (५ प्रती)